# मनपाची शहरभर अनाधिकृत बांधकाम विरोधी धडक मोहीम

## दोन एफएसआयपेक्षा अधिक बांधकामाच्या इमारतीवर हातोडा

नांदेड : नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने आज रविवारी (दि. २०) सकाळपासून अचानकपणे अनाधिकृत बांधकाम विरोधी मोहीम हाती घेतल्याने बिल्डर्स लोकांचे धाबे दणाणले आहेत. शहरातील सहाही क्षेत्रिक कार्यालयाअंतर्गत एकूण सात ठिकाणी दोन पेक्षा अधिक चटई क्षेत्राचा अधिक वापर करणाऱ्या इमारतींचा अधिकचा भाग क्रेन तसेच ब्रेकर मशिनने पाडण्यात आला. हा खर्च संबंधित मालमत्ता धारकांच्या नावावर मनपा महसुल आकारणीत वर्ग करून त्यांच्याकडून वसुल करण्यात येणार असल्याचे सुत्रांनी सांगितले.

रविवारसारख्या साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी मनपाची सारी यंत्रणा आज दिवसभर अनाधिकृत बांधकाम पाडण्याच्या मोहिमेत मग्न होती. या कारवाईचे सर्वस्तरातून जोरदार स्वागत केले जात आहे. गेल्या दोन महिन्यापासून अनाधिकृत बांधकाम करणाऱ्या मालमत्ता धारकांविरूद्ध गुन्हे नोंदविण्याची कारवाई मनपा यंत्रणेमार्फत सुरू होती. संबंधित मालमत्ता धारकांनी त्यानंतरही आपले बांधकाम कायम ठेवले तर काहींनी पुन्हा सुरू केले होते. मंजूर नकाशाच्या तुलनेत जास्तीत जास्त बांधकाम करणाऱ्या मालमत्ता धारकांच्या व्यावसायिक व्यवहाराच्या मालमत्तेवर मनपाने आज हातोडा चालविला. ही मोहीम पुढेही सुरूच ठेवण्यात येणार असून सदनिका किंवा बांधकाम केलेली मालमत्ता घेतांना संबंधितांनी सदर बांधकामाच्या क्षेत्राला मनपाची परवानगी असल्याची खात्री घेवूनच व्यवहार करावा, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

मनपा आयुक्त डॉ. निपुण विनायक, अतिरिक्त आयुक्त राम गगराणी तसेच उपआयुक्त रत्नाकर वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. शिवाजीनगर क्षेत्रिय कार्यालय क्र. १ अंतर्गत सहाय्यक आयुक्त अनिल माचेवाड, क्षेत्रिय अधिकारी प्रकाश येवले, कार्यकारी अभियंता सुग्रीव अंधारे यांच्या पथकाने वाडीया फॅक्ट्री येथील डॉ. सुरेश व वर्षा कदम यांच्या मालकीच्या इमारतीवर हातोडा चालवला. सदर इमारतीस १६४.४४ चौरस मिटर बांधकामाची परवानगी असतांना त्यांनी ७०२.०५ अर्थात ४७५.१३ चौरस मिटर अतिरिक्त बांधकाम केल्याचे निर्दशनास आल्याने ही कारवाई केली.

अशोकनगर क्षेत्रिय कार्यालय क्र. २ अंतर्गत म. सजाद महेमुद अली यांच्या कैलासनगर येथील इमारतीस ४७७.३३ चौरस मिटर बांधकाम अनुज्ञेय असतांना त्यांनी ७०२.१८ (२४०.८२ अतिरिक्त) बांधकाम केले. त्यामुळे उपआयुक्त रत्नाकर वाघमारे, क्षेत्रिय अधिकारी अविनाश अटकोरे, कार्यकारी अभियंता भागानगरे यांच्या पथकाने इमारतीवर हातोडा चालवला.

इतवारा क्षेत्रिय कार्यालय क्र. ३ अंतर्गत सुरजाबाई रतनलाल वर्मा यांनी त्यांच्या मारवाड गल्लीतील इमारतीला २०२.९० चौरस मिटर बांधकाम अनुज्ञेय असतांना ५२८.२० चौरस मिटर बांधकाम केले. यातील ३०६.७० चौरस मिटर बांधकाम अतिरिक्त असल्याने सदरचे बांधकाम पाडण्यात आले. सहाय्यक आयुक्त (अनाधिकृत बांधकाम) महेश वडदकर, क्षेत्रिय अधिकारी सुधीर इंगोले, कार्यकारी अभियंता माधव बाशेट्टी, सहाय्यक नगररचना कामठाणे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

वजिराबाद क्षेत्रिय कार्यालय क्र. ४ अंतर्गत बोरबन फॅक्ट्रीमधील डॉ. मनिष कत्रुवार यांच्या इमारतीसाठी ६७३.३१ चौरस मिटर बांधकाम अनुज्ञेय असतांना त्यांनी एकूण १८८९.५६ चौरस मिटर बांधकाम केले. १२१६.२५ इतके अतिरिक्त बांधकाम केले. त्याच बरोबर आनंद गिल्डा, राजेश दागडिया, जितेंद्र हुंडीवाला यांच्या संयुक्त मालकीच्या इमारतीस १०६४ चौरस मिटर बांधकाम अनुज्ञेय असतांना त्यांनी आपल्या चार मजली इमारतीस २४३५.८८ मिटर (अतिरिक्त १३८६.९६) बांधकाम केले. त्यामुळे दोन्हीही इमारतीवर हातोडा टाकण्यात आला. शहरातील सर्वात मोठी कारवाई याच भागात झाली. सहाय्यक आयुक्त (स्वच्छता) सौ. वसुधा फड यांच्या नेतृत्वाखाली कार्यकारी अभियंता गिरीष कदम, रंजित पाटील, स्वच्छता निरीक्षक गंदमवार, इमारत निरीक्षक जसपालसिंघ उपद्रव शोध पथकाचे कर्मचारी, स्वच्छता ठेकेदाराचे प्रतिनिधी साहेबराव गायकवाड व मजुरांनी या मोहिमेत सहभाग नोंदवला.

क्षेत्रिय कार्यालय क्र. ५ सिडको अंतर्गत कौठा येथील रेखा नारायणराव ढगे यांच्याकडे ९६.२३ चौरस मिटर बांधकाम अनुज्ञेय असतांना त्यांनी २९३.४३ चौरस मिटर बांधकाम (अतिरिक्त १८३ चौ.मी.) केले. दोन पेक्षा अधिक चटई क्षेत्राचे बांधकाम उपआयुक्त (बीएसयुपी) संतोष कवडे, क्षेत्रिय अधिकारी गुलाम सादेख, कार्यकारी अभियंता कलिम परवेज यांनी पाडले. तरोडा क्षेत्रिय कार्यालय क्र. ६ अंतर्गत उपआयुक्त (महसुल) डॉ.सौ. विद्या गायकवाड, कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जोशी, क्षेत्रिय अधिकारी मोहन डिंकाळे, सहाय्यक आयुक्त जगदिश कुलकर्णी, गणेश आडेरागो, स्वच्छता निरीक्षक ढगे आदींनी चक्रधरनगर परिसरातील सौ. रेणुका अनिल ढगे यांच्या इमारतीवर हातोडा चालवला. सौ. ढगे यांच्याकडे ३०० चौरस मिटर बांधकाम अनुज्ञेय असतांना त्यांनी ५१५ चौरस मिटर बांधकाम केले. त्यामुळे दोन पेक्षा अधिक चटई क्षेत्राचे बांधकाम पथकाने पाडले. आजच्या मोहिमेत मनपाच्या विविध अधिकारी, विभाग प्रमुख, स्वच्छता निरीक्षक, इमारत निरीक्षक, स्वच्छता कामगार आदींनी सहभाग नोंदवला.